REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकी व अध्यापन परिणामकारकता यातील सहसंबंधाचा अभ्यास

श्रीमती वंदना हिरामण निंभोरे[१] , प्राचार्य, डॉ. लता सुभाष मोरे[२]
[१]श्री. आण्णासाहेब डि.व्ही. पाटील ,ज्युनिअर कॉलेज, नगांव.
[२]सु. हि. नाईक, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर जि. नंदुरबार.

*सारांश :*

प्रस्तुत संशोधन अभ्यासात संशोधिकेने शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीचे व अध्यापन परिणामकारता यातील सहसंबंधाचा अभ्यास केला. या अभ्यासात न्यादर्शाचा आकार १०० होता. अभ्यासातील शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीचे मापन करण्यासाठी डॉ. विशाल सुद यांनी प्रमाणित केलेल्या कसोटीचा उपयोग करण्यात आला. तसेच अध्यापन परिणामकारकता या चल घटकाचे मापन करण्यासाठी डॉ. शालू पूरी आणि प्रो.एस.सी. गठार यांनी प्रमाणित केलेल्या कसोटीचा उपयोग करण्यात आला. व्यावसायिक बांधिलकीच्या बाबतीत तसेच अध्यापन परिणामकारकतेच्या बाबतीत विद्यार्थी शिक्षक आणि शिक्षिका यांची तुलना केली असता त्यांच्यातील फरक (०.०५) सार्थकता स्तरावर सार्थक नसल्याचे आढळून आले. व्यावसायिक बांधिलकी व अध्यापन परिणामकारकता यांच्यातील सहसंबंध ($r$ =०.२४) आला व ते (०.०५) सार्थकता स्तरावर सार्थक असल्याचे आढळून आले.

**प्रस्तावना :**

देशाच्या विकास हा शिक्षकांच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. म्हणून शिक्षकीपेशा हा सर्व व्यवसायामधील उत्कृष्ट व्यवसाय म्हणून ओळखला जातो. परंतु हे केव्हा घडू शकते ज्यावेळेस शिक्षक आपल्या स्वतःला वैयक्तिक आणि व्यावसायिकदृष्ट्या अद्ययावत ठेवेल.

शिक्षकांना देशाची जडण-घडण करणारे आधारस्तंभ म्हणून ओळखले जाते. ज्यावेळी हे आधारस्तंभ परिपूर्ण राहतील व आपली जबाबदारी पूर्णपणे पार पाडतील तेव्हाच देशाचा विकास होऊ शकतो. परंतु हे सर्व केव्हा घडू शकते जेव्हा शिक्षक आपल्या व्यवसायांमध्ये पूर्णपणे झोकून देतील तेव्हा म्हणजेच शिक्षक आपल्या व्यवसायाशी बांधिल राहतील तेव्हाच गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा ध्यास धरतील तेव्हाच हे घडू शकते. अर्थात बांधिलकी म्हणजे आपल्या व्यवसायावर असलेली निष्ठा.

- **बांधिलकीचा अर्थ :**

“A person’s belief in and acceptance of value of his or chosen occupation or line of work and willingness to maintain membership in that occupation ”

( Vandenberg and scarpello: 1994)

“आपल्या विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी समर्पित वृत्तीने श्रम करणे व पुरेसा वेळ देण्याची शिक्षकांची तयारी म्हणजे बांधिलकी होय.”

- **अध्यापन परिणामकारकता :**

“शिक्षकाने केलेल्या अध्यापनाची, अध्यापनाची अपेक्षित अशी फलनिष्पत्ती म्हणजेच अध्यापन परिणामकारकता होय. ”

शिक्षक जेव्हा आपल्या व्यवसायाशी बांधिल राहतील तेव्हा त्याचा परिणाम अध्यापनाचा दर्जा उंचावण्यासाठी होईल. म्हणून व्यावसायिक बांधिलकी अ अध्यापन परिणामकारकता या दोघांमधील सहसंबंध शोधण्यासाठी प्रस्तुत संशोधन अभ्यास हाती घेतलेला आहे.



- **समस्या विधान :** शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकी व अध्यापन परिणामकारकता यातील सहसंबंधाचा अभ्यास.

- **उद्दिष्टये :**

१) शिक्षणशास्त्र महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक बांधिलकीचे मापण करणे.

२) शिक्षणशास्त्र महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अध्यापन परिणामकारकतेचे मापण करणे.
३) शिक्षणशास्त्र महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची व्यावसायिक बांधिलकी आणि अध्यापन परिणामकारकता यातील सहसंबंध शोधणे.

- **परिकल्पना :**

१) विद्यार्थी शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी आणि अध्यापन परिणामकारकता यांच्यात धन सहसंबंध असतो.

- **शून्य परिकल्पना :**

१) विद्यार्थी शिक्षकांच्या आणि शिक्षिकांच्या व्यावसायिक बांधिलकीच्या बाबतीत लक्षणीय फरक नसतो.
२) विद्यार्थी शिक्षकांच्या आणि शिक्षिकांच्या अध्यापन परिणामकारकतेच्या बाबतीत लक्षणीय फरक नसतो.

- **न्यादर्श :** प्रस्तुत संशोधनासाठी पारोळा तालुक्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील १०० विद्यार्थ्यांच्या सुगम यादृच्छिकतेच्या पध्दतीचा उपयोग करुन न्यादर्शाची निवड केली.

- **संशोधनाची साधने :**

१) शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीचे मापन करण्यासाठी डॉ. विशाल सुद यांनी प्रमाणित केलेली चाचणी वापरली.
२) अध्यापन परिणामकारकतेचे डॉ. शालू पूरी आणि प्रो. एस.सी.गखर यांनी प्रमाणित केलेली चाचणी वापरली.

- **सारणी क्र. १ :**

**शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक बांधिलकीचे मध्यमान गुणांक, प्रमाण विचलन, t मूल्य**

| | न्यादर्श | मध्यमान | प्रमाणविचलन | t मूल्य |
|---|---|---|---|---|
| विद्यार्थी शिक्षक | २९ | ३२.२८ | १४.२८ | ०.१५ |
| विद्यार्थी शिक्षिका | ७१ | ३२.८४ | १०.५० | |

- **परिकल्पना :**

**सारणी क्र. १ मध्ये** विद्यार्थी शिक्षकाचे व्यावसायिक बांधिलकीचे मध्यमान गुणांक (३२.३८) असून विद्यार्थी शिक्षकांचे मध्यमान गुणांक (३२.८४) आहे. दोघही मध्यमानातील (०.४८) आहे. दोघांमधील फरक सार्थक आहे. किंवा नाही हे तपासण्यासाठी t मूल्य काढले असता (०.१५) आले आहे. स्वाधिनता मात्रा (df) ९८ करीता (०.०५) या सार्थकता स्तरावर सारणी मूल्यापेक्षा प्राप्त मूल्य कमी (०.५ <१.६६) आहे. परिणामतः शून्य परिकल्पनेचा स्विकार केला. याचा अर्थ असा की मध्यमान गुणांकामधील फरक लक्षात घेण्यासारखा नाही. याचाच अर्थ असा की, विद्यार्थी शिक्षक व विद्यार्थी शिक्षिका व्यावसायिक बांधिलकी लक्षणिय फरक नाही.

- **सारणी क्र. २ :**

**शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन परिणामकारकतेचे मध्यमान गुणांक प्रमाण विचलन, t मूल्य**

| | न्यादर्श | मध्यमान | प्रमाणविचलन | t मूल्य |
|---|---|---|---|---|
| विद्यार्थी शिक्षक | २९ | ३४.३७ | २३.०६ | ०.२२ |
| विद्यार्थी शिक्षिका | ७१ | ३४.३८ | ५.४४ | |

**सारणी क्र. २ मध्ये** विद्यार्थी शिक्षकांचे अध्यापन परिणामकारकतेचे मध्यमान गुणांक (३५.३७) असून विद्यार्थी शिक्षकांचे मध्यमान गुणांक (३४.३८) आहे. दोघाही मध्यमानातील फरक (०.९९) आहे. हा फरक सार्थक आहे. किंवा नाही हे तपासण्यासाठी t मूल्य काढले असता (०.२२) आले आहे. स्वाधिनता मात्रा (df) ९८ करीता (०.०५) या सार्थकता स्तरावर सारणी t मूल्य (१.६६) आहे. प्राप्त t मूल्य हे सारणी t मूल्यापेक्षा कमी (०.२२ < १.६६) आहे. परिणामतः शून्य परिकल्पनेच्या स्विकार केला. याचा अर्थ असा दोन मध्यमान गुणांकामधील फरक लक्षात घेण्यासारखा नाही. म्हणजेच विद्यार्थी शिक्षक व विद्यार्थी शिक्षिकांच्या अध्यापन परिणामकारकतेत लक्षणिय फरक नाही.

- **सारणी क्र. ३ :**

| चले | सहसंबंध | सार्थकता स्तर |
|---|---|---|
| शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी | ०.२४ | ०.०५ |
| अध्यापन परिणामकारकता | | |

- **परिकल्पना :**

**सारणी क्र. ३** मध्ये शिक्षणशास्त्र महाविद्यायातील विद्यार्थी शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीचे व अध्यापन परिणामकारकतेचे सहसंबंध गुणांक (०.२४) आलेला आहे. स्वाधिनता मात्रा (df) ९९ करीता सारणी सहसंबंध गुणांक (०.१९) आहे आणि प्राप्त सहसंबंध गुण (०.२४) असून ते सारणी सहसंबंध गुणांकापेक्षा

जास्त ( ०.२४ > ०.१९) आहे. म्हणजेच शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी आणि अध्यापन परिणामकारकता या दोघी चलांमधील सहसंबंध धन स्वरुपाचा व सार्थक आहे. म्हणजेच व्यावसायिक बांधिलकी असणाऱ्या विद्यार्थी शिक्षकांची अध्यापन परिणामकारकता उत्तम असते.

- **निष्कर्ष :**

१) शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक व शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी सारखी असते.
२) अध्यापन परिणामकारकतेच्या बाबतीत शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक व शिक्षिका दोघेही सारखेच आहे.
३) शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील व्यावसायिक बांधिलकी असलेल्या विद्यार्थी शिक्षकांची अध्यापन परिणामकारकता उत्तम असते.

- **संदर्भ सूची :**

१) **शेवतेकर शा आणि निकुमे (२०११) : भारतीय शिक्षक प्रणाली, नागपूर : विद्या प्रकाशन.**
२) **पंडित ब. बि., पाटील न. आणि मोरे ल. (२००९) : शिक्षक शिक्षण, नागपूर : पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स.**
३) Lawrence A.S. and Deepa T. ( March 2013) : Teacher Commitment in Promoting Education, retrieved from http://www.academic.edu/1462058
४) Goyal S. (2012) Professional Commitment among B.Ed. Teacher Educators retrieved from http://www.srjis.com